

कृषि क्षेत्रातील मार्केटिंग करणाऱ्यांना सुवर्णसंधी..
उद्योजक होण्याची तसेच कंपन्यांना मोफत जाहीरात करण्याची सुवर्ण संधी !!

सप्टेंबर - २००८
मुल्य २५/-

असेल सोबत मासिक

# गोडवा शेतीचा

तर होईल विकास शेती आणि शेतकऱ्यांचा



कृषी, विज्ञान, उद्योजकीय, समाजहिताची माहिती देणारे मासिक

* पुणे * वर्ष २ रे * अंक ५ वा



## डाळींब विशेषांक

हंगामी पीके,व इतर भरपुर माहितीसह

वेधक-वाचनीय...

* यशोगाथा यशस्वी वराहपालन करणारे गोपाल सुराल
* सत्तरीतील तरूण वैजनाथ रेवडकर अप्पाचे आदर्श डाळिंब व्यवस्थापन



तेल्यामुक्त डाळींबाची जात अर्ली भगवा नंदिनीरत्न जंबो भगवा डाळींब विकसीत करणारे -अनंत कानिटकर




मेहंगा हसे बार बार
एकदाच जर थोडीशी जास्त किंमत मोजली
तर अस्सल जैन उत्पादनं विकत घेता येतात.
सहाजिकच पुढे होणारे नुकसान, वेळ, पैसा यांची
बचत होते.
अनेक जण पाण्यासारखा पैसा खर्च करतात.
डुप्लिकेट माल विकत घेतात आणि शेतीचं
नुकसान करतात. स्वस्तात माल विकत घेतल्यानं
सुरवातीला वाटलेलं समाधान, हसूं कुठल्या कुठे
निधून जातं पण वेळ हातातून गेलेली असते.
आणि जो समजूतदार शेतकरी जैन उत्पादनं
विकत घेतो तो
कायमच हसतमुख राहतो.
उच्च प्रतीच्या कच्च्या मालापासून तयार केलेली,
काटेकोर तपासणी झालेली, श्रेष्ठ गुणवत्ता
असलेली जैन उत्पादनं म्हणजे,तुमच्या पैशाचा
आणि कष्टाचा पुरेपूर मोबदला!
अस्सल घ्या - जैन उत्पादनंच घ्या.
जैन
जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि.
कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.
पो.बॉ.७२, बांभोरी, जळगाव - ४२५ ००१. दूरध्वनी: ०२५७-२२५८०११/२२, ई-मेल: jisl@jains.com, वेबसाईट: www.jains.com
जैन पाईप
जैन ठिबक
जैन पीई पाईप
जैन स्प्रिंकलर
जैन टिश्यूकल्चर
जैन सौरबंब
जैन ग्रीन हाऊस

# भवरलालजी जैनांसारख्या विभूतीच्या कार्यातील एक टक्का भाग जरी अनुसरला तरी जीवन धन्य होईल.

हैदराबाद, दि. २७ (प्रतिनिधी) - भवरलालजी जैन सारखी विभूती समाजात ५०० वर्षांनी जन्माला येत असते, त्यामुळे त्यांचे गौरव करणे व त्यांनी केलेल्या कार्याचा एक टक्का भाग जरी अनुसरला तरी आपल्या सारख्यांचे जीवन धन्य होईल. असे गौरद्गार दक्षिणांचल चोरडीया, गोलेच्छा, गादीया, पारख गोत्र संम्मेलन समितीचे अध्यक्ष हैदराबादचे ताराचंदजी चोरडीया यांनी जेष्ठ विचारवंत जैन इरिगेशनचे संस्थापक अध्यक्ष भवरलालजी जैन यांच्या सत्कार प्रसंगी काढले. आंध्रप्रदेशातील श्री श्वेतांबर कुलपाकजी तीर्थ, आलेर येथे दक्षिणांचल चोरडीया सहगोत्र स्नेहबंधन २६ ते २७ रोजी पार पडले त्याप्रसंगी जैन इरिगेशन, जळगावचे संस्थापकीय अध्यक्ष भवरलालजी जैन यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.



हैदराबाद सकल जैन समाजाच्यावतीने व आचार्य प. पू. राजयशसुरीश्वरजी महाराजांच्या प्रेरणेने फिलखाना जैन संघात काल सकाळीच भवरलालजी जैन यांचा समाजरत्न ही मानाची पदवी देण्यात आली. चोरडीया गोत्रामध्ये पद्म पुरस्काराने गौरव झालेले भवरलालजी हे दुसरे व्यक्ती आहेत. २५ जुलै रोजी तमीळनाडू कृषी विद्यापीठाद्वारे त्यांना चौथी डॉक्टरेट पदवी प्रादन करून गौरविण्यात आले. भवरलालजी जैन हे समाजातील एक आदर्श व्यक्तीमत्व आहे. त्यांच्या प्रेरणेनेच आम्ही हे दक्षिणांचल सहगोत्र संम्मेलन येथे भरविले आहे. असे या सम्मेलन आयोजन समितीचे अध्यक्ष ताराचंदजी चोरडीया म्हणाले. कार्यक्रमात देण्यात आलेल्या मानपत्राचे वाचन भागचंदजी गोलेच्छा यांनी केले. आरंभी भवरलालजी जैन यांना साफा बांधून मंगल -तिलक करण्यात आले. या प्रसंगी सम्मेलनास उपस्थित सर्वांनी जागेवर उभे राहून टाळ्या वाजवून अभिवादन केले.

प्रदान करण्यात आलेल्या सन्मानचिन्हावर जैन दर्शनाच्या मौलिक सिद्धांतां स्पष्ट करणाऱ्या या चित्रात आशीर्वादासाठी दाखविलेल्या हातात सुवर्ण बिंदू जिवात्म्याची शुद्धता दर्शवित आहे. निसर्गाच्या पंच महाभूतांमध्ये उज्वल असा लाल अग्नी, प्रशांत निळे जल, पोषक हिरवी भूमी, अनंत असे शुभ्र आकाश और स्वर्णिम असा प्राणवायू अंतर्भूत आहे. हेच पंच महाभूत जैन दर्शनच्या संदेशातील दैवी दूत आहेत. तेच मानवाच्या जीवनातील अंतिम स्थिती असलेल्या मोक्ष प्राप्तीमध्ये सहाय्यक आहेत. असे अंकीत केलेले आहे. याच आधारावर डॉ. भवरलाल जैन यांनी कृषि तंत्रज्ञान आणि जल व्यवस्थापन क्षेत्रात अद्वितीय कार्य केल्यामुळेच भारताच्या राष्ट्रपतींनी त्यांना पद्मश्री ने सन्मानित केले आहे. याबद्दल व त्यांनी केलेल्या अजोड सामाजिक कार्याबद्दल आम्ही दक्षिणांचल चोरडीया, गोलेच्छा, गादीया पारख सम्मेलन समिती, त्यांचा यथोचित गौरव केला आहे.

या संमेलनात समाज बांधवांना आपली संस्कृती जपताना येणाऱ्या समस्या, त्यावर विचारमंथल व त्याची सोडवणूक करण्यासाठी देशभरातून अनेक मान्यवर येथे आले होते. या कार्यक्रमाचे प्रेरणास्त्रोत असलेले भवरलालजी जैन यांचा विशेष गौरव या कार्यक्रमात या बांधवांनी केला. यावेळी अनेकांनी त्यांच्या गौरवार्थ आपले विचार व्यक्त केले.

**श्री शांतीलालजी मुथा** -भवरलालजी जैन यांच्या गौरवार्थ भारतीय जैन संघटनेने अध्यक्ष शांतीलालजी मुथा म्हणाले की, समाजात कष्ट करणारे पैसा कमावणारे, व्यापार उद्योग करणारे व्यक्ती भरपूर आहेत. परंतु नैतिक मूल जोपासून विकास साध्य करणारे व्हिजनरी व्यक्ती म्हणून मी भवरलालजी जैन यांच्याकडे बघतो. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरीत होऊन कठोर परिश्रमाने समाज नव्हे तर संपुर्ण जगात आपल्या कार्याचा अमिट असा ठसा उमटविला आहे नैतिक मूल्य जपणारे, समाजाचा विकास कसा होईल याची चिंता वाहणारे भवरलालजी जैन यांचे मार्गदर्शन मिळणे ही फार उत्तम बाब आहे.

**श्री. चैनराजजी जैन**

बंगलोर येथील भगवान महावीर इंटरनॅशनल स्कूल कॉलेजचे संस्थापक चैनराज जैन भवरलालजींबद्दल गौरवोद्गार काढताना

****